REGISTERED No. B. 3434

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ | पुणें, बुधवार तारीख ५ जुलै, १९५० | अंक २७


## पुणें सिटी म्युनिसिपल कॉर्पोरेशन

# ३½ टक्के डिबेंचर लोन्स

१. रुपये ३० (तीस) लाखांचें पुणें म्यु. डिबेंचर लोन १९५०–६५
(मुद्दल व व्याज या दोहोंची हमी मुंबई सरकारनें घेतली आहे.)

२. रुपये १४,३२,९०० चें पुणें म्युनिसिपल ट्रॅन्सपोर्ट अंडरटेकिंग डिबेंचर लोन १९५०–६०

हीं दोन्हीं कर्जें उभारण्याचे बाबतींत हमी ( अंडर राईट ) मिळाली आहे.

कर्जांचे अर्ज स्वीकारण्याच्या तारखा १२ जुलै ते १४ जुलै १९५० अशा आहेत.
मात्र आवश्यक तेवढ्या कर्जाची रक्कम उभी राहिल्यास नोटीस दिल्याशिवाय
त्यापूर्वीं केव्हांहि अर्ज स्वीकारणें बंद करण्यांत येईल.

दर १०० रुपये दर्शनी लोनची किंमत १०० रुपये राहील.

प्रत्येक डिबेंचर दर्शनी ५०० रुपयांचें किंवा ५०० रुपयांच्या पटीचें राहील.

जरुरीपेक्षां जास्त रक्कम जमा झाल्यास कॉर्पोरेशन आपल्या सोयीनें प्रमाणशीर वांटप करील आणि जास्त आलेली रक्कम बिनव्याजीं परत करील.

अर्ज आणि रकमा इंपिरियल बँक ऑफ इंडियाच्या खालीं नमूद केलेल्या कचेर्‍यांतून स्वीकारल्या जातील व त्या ठिकाणीं अर्जाचे नमुने व अधिक माहिती दिली जाईल:—

मुंबई हेड ऑफिस, पुणें कँप, पुणें शहर, अहमदाबाद, अहमदनगर, बेळगांव, देवळाली, हुबळी, हैद्राबाद ( दक्षिण ), नाशिक आणि सोलापूर.

जा. क्र. ६५
म्युनिसिपल कॉर्पोरेशन कचेरी,
विश्रामबाग वाडा.
ता. १ जुलै १९५०

स. गो. बर्वे,
म्युनिसिपल कमिशनर,
पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशन.



—सर्व प्रांतांतील—
सुती–गरम–रेशमी
—खादीचें माहेरघर—

## खादी मन्दिर

९६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

पांच हॉर्स पावरचें
डिझेल एंजीन
घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.
केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

## विविध माहिती

**कानपूरमध्यें खोटीं शिधापत्रकें**—कानपूरमधील शिधा अधिकार्‍यांनीं १५ दिवस शिधापत्रकांची तपासणी केली असतां त्यांना ३६,८९१ खोटीं शिधा-कार्डें आढळून आलीं. ह्या कार्डांवरील धान्य आतां द्यावें लागणार नाहीं; त्यामुळें दरमहा २२,११० मण अन्नधान्य आणि १,६६२ मण साखर ह्यांची बचत होईल.

**रशियाचा कागद आला**—मद्रास बंदरांत दोन रशियन बोटी आल्या आहेत. एका बोटीनें ३९८ टन आणि दुसरीनें ३२६ टन वृत्तपत्रांना लागणारा कागद आला आहे.

**अमेरिकेंतील बँका घाबरल्या**—कोरियांत युद्ध सुरू झाल्यापासून अमेरिकेंतील बँका घाबरल्या आहेत. एका प्रमुख बँकेच्या उपाध्यक्षानें असें जाहीर केलें कीं पाश्चिमात्य राष्ट्रांनीं द. कोरियाला शक्य ती सर्व मदत करावी. परंतु सो. रशियाशीं युद्ध मात्र करण्याचा प्रसंग ओढवून घेऊं नये. ह्या बँकेच्या आशिया खंडांत अनेक शाखा आहेत.

**कराचींत औद्योगिक प्रदर्शन**—ता. १ सप्टेंबरपासून १५ ऑक्टोबर, १९५० पर्यंत भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शनांत लहान लहान १०० जर्मन कारखानें भाग घेणार आहेत. प्रदर्शनांत जपानही भाग घेणार आहे. जपानच्या मालाच्या मंडपासाठीं ५०,००० चौरस फूट जागा राखून ठेवण्यांत आली आहे.

**स्वीडनमध्यें हिन्दी मालाचें प्रदर्शन**—येत्या ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यांत भरविण्यांत येणार आहे. भारताचे स्वीडनमधील वकील श्री. आर. के. नेहरू ह्यांनीं त्या कामांत पुढाकार घेतला आहे. भारत आणि स्वीडन ह्यांच्यामधील व्यापार वाढविणें हा प्रदर्शनाचा हेतु आहे.

**इंडोनेशिया-ब्रह्मदेश व्यापारी करार**—इंडोनेशियाच्या सरकारनें ब्रह्मदेशाकडून १,३५,००० टन तांदूळ विकत घेण्याचा करार केला आहे.

**१५९९ सालचें पत्र**—जर्मनींतील सर्वांत जुनें वृत्तपत्र १६४९ सालीं प्रसिद्ध झालें असें मानण्यांत येत होतें. परंतु द. जर्मनींतील एका गांवच्या जुन्या कागदपत्रांत १५९९ सालीं छापलेल्या एका वृत्तपत्राचा उल्लेख नुकताच आला आहे.

**चीनमध्यें रशियन पाठ्यपुस्तकें**—चीनमधील शाळा-कॉलेजांतून वापरण्यासाठी रशियन पाठ्यपुस्तकांचें चिनी भाषेंत भाषांतर करण्यांत येणार आहे. चीनमधील नव्या लोकराज्याचें शिक्षणविषयक धोरण खाजगी व मिशनरी शाळांनीं पाळलें पाहिजे असे हुकूम देण्यांत आले आहेत. शिक्षकाचा दृष्टिकोनही पद्धतशीरपणें बदलण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत.

**बँकांना आणि विमा कंपन्यांना इशारा**—भारत सरकारनें एक हुकूम काढून असा इशारा दिला आहे कीं, ज्या बँका आणि विमा कंपन्या लवादानें दिलेले निकाल अंमलांत आणणार नाहींत अगर त्यांचा भंग करतील त्यांच्यावर खटले भरण्यांत येतील.

**राज्यघटनेचें संस्कृतांतील रूपांतर**—भारताच्या राज्यघटनेचें संस्कृतमधील रूपांतर सप्टेंबर १९५० च्या सुमारास प्रसिद्ध करण्यांत येईल असें समजतें. हें भाषांतर करण्यासाठी नेमलेल्या कमिटीचे दोन सभासद प्रथम संस्कृत मसुदा तयार करतील आणि नंतर तो सव सभासदांकडे तपासणीसाठी पाठविण्यांत येईल.

**पंगूंची परिषद**—गुजराथमधील लंगड्या लोकांची एक परिषद नवसारी येथें भरविण्यांत येणार आहे. परिषदेचें अध्यक्षस्थान एका पंगु पत्रपंडिताला देण्यांत आलें आहे. पंगु लोकांना सरकारनें नोकरींत घ्यावें अशी विनंती परिषद सरकारला करणार आहे.

**पाकिस्तानांत तेलाच्या खाणी**—पाकिस्तान-आसाम सरहद्दीवरील पथारिआच्या जंगलांत तेलाच्या खाणी उघडण्यांत येणार आहेत, असें समजतें. पाकिस्तान सरकारनें बर्मा ऑईल कंपनीशीं तेल उपसण्यासंबंधीं करारहि केला आहे. बर्मा ऑईल कंपनीतर्फे ह्या कामासाठीं दुय्यम कंपनी लवकरच काढण्यांत येणार आहे.

**कलकत्ता विद्यापीठ आर्थिक संकटांत**—कलकत्ता विद्यापीठाच्या जून, १९५१ अखेरच्या अंदाजपत्रकांत २२,२५,००० रुपयांची तूट येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. जनरल फी फंडाच्या खातीं विद्यापीठाला ६,७३,३५८ रुपये शिल्लक रहातात. परंतु पदवीपरीक्षेनंतर, अभ्यासक्रमाच्या खातीं १८,९२,४१२ रुपये कमी येतात. मागील सालच्या अंदाजपत्रकांतील तूट लक्षांत घेऊन एकूण तूट वरील रकमेइतकी आहे.

**अमेरिकेंतील टेलिव्हिजन**—अमेरिकेंतील ६२ शहरांतून टेलिव्हिजनचे कार्यक्रम प्रक्षेपित करणारीं १०४ केंद्रें आहेत. आणखी पांच केंद्रें उभारण्यांत येत असून फेडरल कम्युनिकेशन्स कमिशनकडे ३५० अर्ज करण्यांत आले आहेत. अमेरिकेच्या ईशान्य भागांत हीं केंद्रें अधिक दाट आहेत. न्यूयॉर्कमधील केंद्राची प्रक्षेपणाची कक्षा सर्वांत अधिक आहे. कारण, ह्या शहरांतील गगनचुंबी इमारतींमुळें प्रक्षेपण सोपें जातें. टेलिव्हिजनचे कार्यक्रम पडद्यावर घेणारे ४०,००,००० सेट्स अमेरिकेंत आहेत. शिवाय हजारों सेट्स तयार करण्यांत येत आहेत.

---

### ऑस्ट्रेलियांत परदेशी गुंतवणूक

युद्धसमाप्तीपासून आतांपर्यंत परदेशीयांनीं १७ कोटी, ३० लक्ष पौण्ड भांडवल ऑस्ट्रेलियांत गुंतविलें आहे, आणि नवें नवें भांडवल आणखी गुंतविलें जात आहे. कांहीं ब्रिटिश कारखानदार कामगार, त्यांचीं घरें, इत्यादींसकट कारखाने तिकडे हलवीत आहेत. कोटीच्या ६०,००,००० पौण्डांचा रेयॉनचा कारखाना त्यांत सर्वांत मोठा आहे. आशियाच्या वाढत्या गरजा पुरविण्यासाठीं ऑस्ट्रेलियांत मुक्काम ठोकणें ब्रिटिश व अमेरिकन कारखानदारांना सोईचें वाटत आहे. युद्धोपयोगी उत्पादनाचे कारखाने एके ठिकाणीं केंद्रित न करतां ते सबंध साम्राज्यांत पसरून ठेवण्याचें ब्रिटिश धोरणहि ऑस्ट्रेलियांतील कारखानदारीच्या वाढीस पोषक झालें आहे. युद्धपरिस्थितीचा ऑस्ट्रेलियाला चांगलाच फायदा झाला आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ५ जुलै, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## प्रोफेसर अॅशूबे ह्यांचे हिंदच्या शेतीबद्दल विचार

मुंबई येथील सर मणिलाल नानावटीप्रभृतींनीं स्थापन केलेल्या इंडियन सोसायटी ऑफ अॅग्रिकल्चरल् एकॉनॉमिक्स् या संस्थेनें ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीच्या कृषिविषयक अर्थशास्त्राच्या संशोधन संस्थेचे डायरेक्टर प्रोफेसर आॅर्थर अॅशबे यांस हिंदमधील कृषिविषयक अर्थशास्त्राच्या शिक्षण व संशोधन या बाबतींतल्या परिस्थितीचें निरीक्षण करण्यासाठीं १९४९ च्या डिसेंबरमध्यें बोलाविलें होतें. १२ डिसेंबर १९४९ पासून २९ जानेवारी १९५० पर्यंत हिंदच्या मुंबई, पुणें, हैद्राबाद, मद्रास, बंगलोर, कोइमतूर, कलकत्ता, अलाहाबाद, दिल्ली, आग्रा इ. भागांत हिंडून, अनेक सरकारी व खाजगी लोकांच्या भेटी घेऊन, खेड्यांतील परिस्थिति पाहून, शेतीचें शिक्षण व त्याबाबतींतील संशोधन याची माहिती मिळवून आपल्या निरीक्षणाच्या आधारें प्रो. अॅशबे यांनीं उपयुक्त अहवाल सादर केला. तो मुंबईच्या उपरिनिर्दिष्ट संस्थेनें प्रसिद्ध केला आहे.

### कृषिविषयक संशोधनाबद्दल

हिंदमधील शेतीच्या लागवडीखालील क्षेत्र, शेतीवर अवलंबून असणारांची संख्या, व देशाच्या अर्थव्यवहारामध्यें शेतीला असलेलें महत्त्व या सर्व गोष्टी विचारांत घेतां प्रो. अॅशबे यांनीं शेतीच्या बाबतींत संशोधनाच्या दृष्टीनें देशांत उपलब्ध असलेल्या अतिशय असमाधानकारक परिस्थितीबद्दल आपलें स्पष्ट मत व्यक्त केलें, व हिंदमध्यें पैशाच्या अभावामुळें शास्त्राच्या व्यावहारिक बाजूची व्हावी तितकी वाढ झालेली नाहीं असेंहि मत व्यक्त केलें आहे. शेतीच्या अर्थशास्त्राची तर पूर्णपणें आबाळ झाली आहे. कृषि-विषयक अर्थशास्त्राचें परदेशांत शिक्षण घेऊन आलेले कांहीं लोक इतर खात्यांत नोकरी करतात असें दृश्य हिंदमध्यें आढळतें, असा प्रो. अॅशबे यांना अनुभव आला आहे. या एका गोष्टीवरूनच संशोधन हिंदमध्यें किती मागासलेलें आहे हें दिसून येईल. सरकारनें व विद्यापीठांनीं शेतीच्या संशोधनाच्या व्यावहारिक बाजूकडे विशेष लक्ष पुरविलें पाहिजे, असें प्रो. अॅशबे यांचें मत आहे. संशोधन जीवनाच्या दृष्टीनें शक्य तितकें विस्तृत करून तें शेतकरी जीवनापर्यंत पोंचविण्याचा प्रयत्न विद्यापीठांनीं केला पाहिजे. या बाबतींत लोकांना प्रथम जरूर तें शिक्षण द्यावें लागेल. शेती मालाची किंमत, ती कशी ठरवितात, विशिष्ट परिस्थितीचा किंमतीवर काय परिणाम होतो, इ. गोष्टींत संशोधन होणें आवश्यक आहे. हिंदमध्यें लागवडीच्या बाबतींत संशोधन करावयास विस्तृत क्षेत्र आहे. शेतीच्या मळ्यावरील संघटना या बाबतींत, व शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांबद्दल, संशोधन करतां येण्यासारखें आहे.

### शेतीची परिस्थिति

प्रत्यक्ष शेतीबद्दल प्रो. अॅशबे यांचें मत असें आहे कीं, प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारामुळें व प्रौढांच्या शिक्षणाकडे जास्त लक्ष पुरविल्यानें हिंदमध्यें सहकारी चळवळ यशस्वी होऊं शकेल. सहकारी संस्था प्रत्यक्ष कशा चालतात याबद्दल जितकें जास्त संशोधन केलें जाईल तितकें तें सहकारी चळवळ यशस्वी होण्याला मार्गदर्शक ठरेल. मुंबई प्रांतांत सरकारनें चालविलेल्या शेतीच्या शाळांबद्दल प्रो. अॅशबे यांचें मत चांगलें आहे व इतर ठिकाणीं त्याचें अनुकरण करण्यासारखें आहे. शेती खात्यातर्फे व इतर संशोधन केंद्रांत चालणारें कार्य सामान्य शेतकरी वर्गापर्यंत पोंचण्यासाठीं 'शेतीच्या शाळा' 'ग्रामसंस्था' 'गांवकरी लोकांचीं मंडळें' यांचा विशेष उपयोग होण्यासारखा आहे. फळझाडांची लागवड जास्त प्रमाणांत करतां येण्यासारखी आहे व या दृष्टीनें संशोधन केलें पाहिजे. हिंदमध्यें शेतीच्या कामाच्यासाठीं यांत्रिक शक्तीचा उपयोग कांहीं प्रमाणांत करतां येण्यासारखा आहे, व त्यामुळें शेतीचें उत्पादनहि वाढेल. परंतु शेतकऱ्याच्या हातांतील साध्या गोष्टींची, म्हणजे नांगर इ० ची, सुधारणा केली तरीहि शेतीचें उत्पन्न थोडेसें वाढूं शकेल. हिंदमध्यें वहातुकीसाठीं रस्त्यांची व वाहनांची वाढ करणें फार आवश्यक आहे. मोटारींच्या वाढत्या वहातुकीमुळें बैलगाड्यांची संख्या थोडी कमी होईल. परंतु अंतिम दृष्ट्या फायद्याच होईल, कारण दुधाचा पुरवठा वाढावयास मदत होईल. सायकलीच्या वाढत्या उपयोगामुळेंहि शेतकऱ्याची परिस्थिति सुधारत आहे. सर्पणाच्या पुरवठ्याच्या बाबतींत झाडांची लागवड करून सुधारणा करतां येईल. शेणाचा उपयोग केवळ खतासाठींच करण्यांत आला पाहिजे. विजेचें उत्पादन व पुरवठा वाढल्यानें, व झाडांची लागवड मोठ्या प्रमाणांत केल्यानें, खतासाठीं शेणाचा उपयोग जास्त प्रमाणांत करतां येईल व त्यामुळें जमिनीचा मगदूर वाढेल. पुढील २५ वर्षांच्या कालावधींतच झाडांची लागवड वाढविल्यामुळें होणारे सुपरिणाम दिसून येतील. त्याचप्रमाणें पाणीपुरवठा वाढविणें व सर्वत्र प्राथमिक शिक्षण देणें यांची आवश्यकता आहे. शेतकऱ्याची हत्यारें, वहातुकीचे रस्ते व राहण्यासाठीं घरें या गोष्टी म्हणजे शेतकऱ्यांच भांडवल आहे. हिंदमध्यें हिंवतापाचें उच्चाटन करण्याची विशेष आवश्यकता आहे. त्याचप्रमाणें, सामान्य स्वच्छतेकडे लक्ष दिलें पाहिजे. शेतकऱ्यांचीं घरें पुष्कळ स्वच्छ असतात. परंतु गांवांतील रस्ते व सार्वजनिक ठिकाणें असावीं तितकीं स्वच्छ नसतात. खेडेगांवें सुधारण्याचे प्रयत्न कांहीं ठिकाणीं सुरू आहेत, परंतु हे सर्व प्रयत्न केवळ स्थानिकच ठरतात. अशा प्रयत्नांचें लोण शक्य तितकें प्रत्येक खेडेगांवांपर्यंत पोंचलें पाहिजे. स्थानिक दृष्ट्या स्वच्छता व आरोग्य यांकडे प्रत्येक ठिकाणीं लक्ष पुरविलें गेलें तर परिणामीं सरासरी आयुर्मर्यादा वाढावयास मदत होईल.

प्रो. अॅशूबे यांनीं प्रमुख ठिकाणीं निरनिराळ्या कृषिविषयक विषयांवर २९ उद्बोधक व्याख्यानें दिलीं. त्यांत सहकार, ग्रामीण जीवनासाठी शिक्षण इ. अनेक विषयांवर त्यांनीं व्याख्यानें दिलीं. प्रो. अॅशूबे या परकी तज्ज्ञाचा अहवाल शेतीच्या प्रश्नांच्या बाबतींत व्यावहारिक दृष्ट्या मार्गदर्शक आहे.

## पुणें म्यु. कॉर्पोरेशनची कर्जउभारणी

पुणें नगरपालिकेचा विस्तार आणि लोकसंख्या ह्यांतच केवळ नव्हे, तर नव्या कॉर्पोरेशन ॲक्टमुळें तिच्या कर्तव्यक्षेत्रांतहि वाढ झाली आहे. कॉर्पोरेशनमध्यें नगरपालिकेचें रूपांतर झालें, तें नाममात्र न होतां म्युनिसिपल कमिशनरनीं पुणें शहराच्या दृष्टीनें योग्य अशा कित्येक सुधारणा तत्काळ हातीं घेतल्या आणि त्यांचा फायदा नागरिकांना मिळूं लागला आहे. कांहीं योजना मोठ्या भांडवली खर्चाच्या असून त्यांचा फायदा ह्या पिढीप्रमाणेंच पुढीलहि अनेक पिढ्यांस होणार आहे. सहाजिकच, अशा योजनांवरील खर्चाच्या बोजाची वाटणीहि न्याय्य व्हावयाची असेल, तर ती अनेक वर्षांवर पसरणें योग्य ठरतें. परंतु, योजनांवरील सबंध खर्च मात्र आधीं करावा लागत असल्याकारणामुळें त्यासाठी कर्ज उभारून तें ठराविक काळांत फेडण्याची व्यवस्था करणें, हाच मार्ग युक्त होय.

पुणें शहरांतील रस्त्यांची शास्त्रशुद्ध सुधारणा, लकडीपूल रुंद करणें, मुठा नदीचें क्षेत्र सुधारून आरोग्याच्या सुखसोयी वाढविणें, नवीन मार्केटस बांधणें, पाणी-पुरवठ्याची योजना सुधारणें, प्राथमिक शाळांसाठी मालकीच्या इमारती बांधणें, इत्यादि उद्देशांचें अगत्य स्पष्ट आहे. तीं कामें तावडतोब हातीं घेण्यासाठी कॉर्पोरेशनला ३०,००,००० रु. चें कर्ज हवें आहे. कॉर्पोरेशनच्या मालकीच्या बस सर्व्हिसच्या प्राथमिक खर्चासाठीहि १४,३२,९०० रु. चें कर्ज उभारण्यांत येत आहेत. अशा रितीनें, कॉर्पोरेशनला एकूण ४४,३२,९०० रु. कर्ज उभारावयाचें आहे. ह्या दोन्हीं कर्जांच्या अटींचा तपशील इतरत्र पहावयास मिळेलच.

### भक्कम आर्थिक परिस्थिति

पुणें नगरपालिकेच्या ९४ वर्षांच्या इतिहासांत तिनें वेगवेगळ्या कारणांसाठी वेळोवेळीं सुमारें ५० लक्ष रुपयांपर्यंत कर्जें उभारलीं. त्यांत तिनें आपली पत उत्कृष्ट रितीनें निर्माण केली आहे. जुन्या कर्जांपैकी फक्त सुमारें १० लाखांचीं कर्जें आतां परत करावयाचीं आहेत. नगरपालिकेच्या उत्पन्न-खर्चाचे आंकडे पाहिले असतां, तिच्या ऐपतीची नीट कल्पना येईल व उभारलेल्या कर्जांची योग्य प्रकारें परतफेड करण्याच्या तिच्या पात्रतेची कल्पना येईल. कॉर्पोरेशन दरसाल १,६७,२९८ रु. + १,२७,९०० रु. = २,९५,१९८ रु. वेगळ्या सिंकिंग फंडांत टाकून व योग्य प्रकारें गुंतवून, कर्जफेडीच्या वेळीं कर्जाची रक्कम उभी ठेवण्याची व्यवस्था करणार आहे. दोन्हीं डिबेंचर कर्जांस सरकारी मान्यता असून, त्यांपैकी ३० लाखांच्या कर्जाच्या व व्याजाच्या फेडीची हमी मुंबई सरकारनें घेतली आहे, आणि कॉर्पोरेशनच्या उत्पन्नाच्या सर्वसाधारण उत्पन्नाचें त्यास तारण आहे. १४,३२,९०० रु. च्या कर्जास कॉर्पोरेशनचें उत्पन्न व बस सर्व्हिसची मालमत्ता ह्यांचें तारण आहे.

### नगरपालिकेचा उत्पन्न-खर्च

| | १९४८-४९ ( प्रत्यक्ष ) | १९४९-५० ( प्रत्यक्ष ) | १९५०-५१ ( बजेट ) |
|---|---|---|---|
| उत्पन्न | ५६,८९,१४४ | ८३,७३,८९३ | ९५,५७,११३ |
| खर्च | ४५,५५,१५६ | ६४,६३,७६२ | ७५,१४,०३५ |
| | ११,३३,९८८ | १९,१०,१३१ | १०,४३,०७८ |

कॉर्पोरेशनचीं डिबेंचर कर्जें ( १ ) मुंबईची प्रसिद्ध फर्म मेरवानजी बनाजी दलाल, ( २ ) बँक ऑफ महाराष्ट्र व ( ३ ) पुणें सें. को. बँक ह्यांनीं अंडरराईट केलेलीं आहेत. त्यामुळें, कर्जउभारणी यशस्वी होईल ह्याबद्दल शंकाच नाहीं.

### कर्जउभारणीचें यश

सहकारी व इतर लहान मोठ्या बँका आणि तत्सम संस्था ह्यांना पुणें कॉर्पोरेशनचें डिबेंचर कर्ज आकर्षक वाटावें, असेंच आहे. पुणें नगरपालिकेची आर्थिक परिस्थिति भक्कम आहे, तिचा कारभार आतां अत्यंत प्रगतिपर आणि कार्यक्षम असा आहे, तेव्हां कर्जाच्या सुरक्षितपणाबद्दल शंका वाटण्याचें कारण नाहीं. कर्जरोखे अल्प मुदतीचे आहेत आणि व्याजाचा दर भारत सरकारच्या रोख्यापेक्षां अधिक आहे. "ट्रस्टी रोखे" म्हणून गणल्या जाणाऱ्या ३० लाखांच्या रोख्यांइतकेच १४,३२,९०० रुपयांच्या रोख्यांस बाकीचे सर्व फायदे असून शिवाय त्यांची परतफेड ५ वर्षे आधीं होणार आहे. पुणें सें. को. बँकेनें हें दुसरें सबंध कर्ज अंडरराइट केलेलें आहे. महाराष्ट्र बँक व पुणें सें. को. बँक ह्यांचा लौकिक स्थैर्य व सुरक्षितता ह्यांस प्राधान्य देण्याविषयीं आहे; घाई किंवा दिखाऊपणाबद्दल नाहीं. अशा ह्या संस्थांनीं कर्ज अंडरराइट केलें, ह्याचा अर्थ स्पष्टच आहे. महाराष्ट्रांतील अग्रेसर शहराच्या कर्जउभारणीस महाराष्ट्रांतील संस्थांनीं व जनतेनें हातभार लावणें हें त्यांचें कर्तव्यच आहे. ह्या कर्जरोख्यांची देवघेव बाजारांत पुढें होऊं लागली म्हणजे अशीं इतरहि कर्जे उभारण्यास प्रोत्साहन मिळेल. त्यांत सर्वांचाच फायदा आहे. कर्जाची उभारणी यशस्वी होईल, ह्याची शक्य ती दक्षता कॉर्पोरेशननें अगाऊच घेतलेली आहे.

### पुणें नगरपालिकेस असलेलें कर्ज ( ३१-३-१९५० )

| कर्ज | परतफेड | व्याजाचा दर | रक्कम देणें |
|---|---|---|---|
| **म्युनिसिपल सर्व्हिस** | | | |
| ड्रेनेज व वॉटर सप्लाय योजना | ... | ४% | १,९८,१३६ |
| जुनें ड्रेनेज कर्ज | १-९-१९६० | ४% | ५,५७,२७४ |
| शिवाजीनगर हाय लेव्हल वॉटर सप्लाय योजना | १-११-१९६९ | ४% | ७७,५०० |
| शाळांच्या नव्या इमारती-१ ला हप्ता | १-२-१९७८ | ४% | १,४३,०१२ |
| | | | ९,७५,९२३-३-० |
| **वहातुक सर्व्हिस** | | | |
| म्यु. बस सर्व्हिस | १९८० | ३½% | ६७,१००-०-० |

### भारत ई. बँकेच्या स्टाफ असोसिएशनचें वार्षिक स्नेहसंमेलन

भारत इं. बँकेच्या स्टाफ असोसिएशनचें ११ वें स्नेहसंमेलन दि. २ जुलै रोजीं, बँकेच्या एक डायरेक्टर सौ. इंदुमती फडके, बी. ए. ( ऑ. ), बी. टी., ह्यांच्या अध्यक्षतेखालीं उत्साहानें पार पडलें. चहापान, फोटो, बैठे खेळ, सिनेमा, नाटक, करमणुकीचे कार्यक्रम, अहवाल वाचन, अध्यक्षांचें व इतर भाषणें, इत्यादि भरपूर कार्यक्रम होता.

## बँकेनें नापास केलेल्या चेकबाबत तारेचा खर्च हॉटेल्स सोसतात

कित्येक लबाड लोक आपल्या हॉटेलांचीं बिलें चेकनें देतात, परंतु हे चेक बँकेंत वटले जात नाहींत. त्यामुळें हॉटेलांचा नफा बुडतो, इतकेंच नव्हे तर त्यांचा प्रत्यक्ष झालेला खर्चहि वसूल होत नाहीं. हे लबाड खुशाल कांहीं दिवस हॉटेलाचा फुकट पाहुणचार घेतात. त्यांचे हे चेक बँकेंतून नापास झाल्याचें हॉटेलवाल्यास जितक्या सत्वर कळेल, तेवढें श्रेयस्कर असतें. कारण, त्यामुळें ह्या बुडव्या लोकांना अटक करून त्यांचेवर खटला भरणें शक्य होतें. आज हॉटेलांना फसवणारे हे लोक उद्यां चेकवर खोट्या सह्या करून बँकांनाहि फसवूं लागतील, ह्या दृष्टीनें बँकांनींहि त्यांचे-विरुद्ध इलाज करण्याकडे लक्ष पुरविणें इष्ट ठरतें.

### हॉटेल्स व बँका ह्यांचा करार

अमेरिकन हॉटेल्स असोसिएशन आणि अमेरिकन बँकर्स असोसिएशन ह्यांचेमध्यें ह्या संबंधांत एक करार झालेला आहे. एखाद्या हॉटेलाची एंडॉर्समेंट असलेला चेक बँकेकडे येऊन तो नापास झाला, तर जिचेवर चेक काढला असेल, त्या बँकेनें कलेक्टिंग हॉटेलला तावडतोब तार करावी आणि चेकचे पैसे देण्यास नकार कां दिला ह्याचीं कारणें त्यांत नमूद करावींत, असें त्या करारान्वयें ठरलें आहे. बँकेच्या इतर नोटिसा किंवा अडव्हाइसेस ह्या नेहमीप्रमाणें अर्थात् जातीलच. अमेरिका आणि कॅनडांतील ऑंटेरिओ आणि क्विबेक हे प्रांत ह्यांतील कोणत्याहि हॉटेलास बँकेनें अशी तार पाठविली तर तिचा खर्च अमेरिकन हॉटेल असोसिएशन भरून देते. १९२८ सालापासून हा करार अंमलांत आहे. अशा तारांत खालीलप्रमाणें मजकूर असतो:— "खट्याळे ह्यांचा १००रुपयांचा चेक परत. खातें बंद. पत्ता : ००० बुधवार". अशा तऱ्हेच्या तारा पाठविण्याविषयीं बँकांचें वरचेवर लक्ष वेधलें तरी त्या प्रत्येक वेळीं तारा धाडतातच असें नाहीं. तार पाठविली नाहीं तरी निदान चेक काढणाराचा बँकेजवळ नोंदलेला पत्ता तिनें चेकच्या पाठीवर लिहून कळवावा, अशी हॉटेलांची अपेक्षा असते.

---

### कायदा आणि आर्थिक स्वातंत्र्य

मध्य प्रांताच्या सरकारनें १९४८ सालीं विड्याच्या धंद्याचें नियंत्रण करण्यासाठीं एक कायदा केलेला आहे. ह्या कायद्यान्वयें शेतकीच्या हंगामांत विड्या तयार करण्यास बंदी करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारनें आपणाकडे घेतला आहे. शेतकीच्या हंगामांत पुरेसे शेतमजूर मिळत नाहींत आणि त्यामुळें अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेंतही अडथळा उत्पन्न होतो. मध्य प्रांतांत शेत-मजुरांचा तुटवडा पडूं लागल्यामुळेंच हा कायदा करण्यांत आला आहे. आतां ह्या कायद्याच्या कायदेशीरपणाबद्दलच आक्षेप घेण्यांत आला आहे. सागर विडी मर्चंट्स असोसिएशनतर्फे सुप्रीम कोर्टाकडे एक अर्ज दाखल करण्यांत आला आहे. ह्या अर्जांत मध्यप्रांत सरकारच्या कायद्याविरुद्ध असा आक्षेप घेण्यांत आला आहे कीं, मध्यप्रांत सरकारला वरील प्रकारचा कायदा करता येत नाहीं म्हणून ह्या कायद्याची अंमलबजावणी स्थगित करण्यांत यावी. वरील आक्षेपाशिवाय, सदर कायदा भारतीय घटनेशींही विसंगत असल्याचें अर्जांत नमूद करण्यांत आलें आहे. भारतीय घटनेच्या १९, व्या कलमांत नागरिकांना संपूर्ण व्यवसाय-स्वातंत्र्य दिलेलें आहे. असें असतांना व्यक्तीच्या ह्या मूलभूत हक्कावरच मध्यप्रांत सरकारच्या कायद्यानें गदा येत आहे असें अर्जदाराचें म्हणणें आहे. मध्यप्रांत सरकारच्या कायद्याची अंमलबजावणी स्थगित करण्याची मागणी करणारा असाच आणखी एक अर्ज एका मजुरातर्फेही करण्यांत आला आहे. दोन्हीही अर्ज सुप्रीम कोर्टानें दाखल करून घेतले आहेत.

कायदा आणि अर्थशास्त्र ह्यांचीं क्षेत्रें सामान्यतः भिन्न मानण्यांत येतात. परंतु, आधुनिक राज्यसंस्थेसंबंधींच्या अपेक्षा आतां इतक्या वाढल्या आहेत, कीं आर्थिक उद्दिष्टांच्या सिद्धीसाठीं प्रसंगोपात् कायदे करावेच लागतात. अर्थशास्त्राचे मामुली सिद्धांत व्यवहारांत लटके पडूं लागले कीं आर्थिक व्यवहारांचें नियमन राज्यसंस्थेनें करूं लागावें हें उचित नाहीं काय? मध्यप्रांत सरकारचा प्रस्तुत कायदा कितपत योग्य आहे, हा प्रश्न अर्थातच स्वतंत्र आहे.

---

### राजकीय स्पर्धेनंतर व्यापारी स्पर्धा

अमेरिकेच्या प्रतिनिधी गृहाची एक कमिटी, सध्यां जगांतील वृत्तपत्रांना लागणाऱ्या कागदाच्या टंचाईची चौकशी करीत आहे. ह्या कमिटीनें मि. जे. बी. पावर्स ह्यांची साक्ष घेतली. मि. पावर्स हे द. अमेरिका, युरोप आणि ऑस्ट्रेलिआ ह्यामधील वृत्तपत्रांच्यातर्फे बोलत होते. त्यांनीं आपल्या साक्षींत असें सांगितलें कीं, द. अमेरिकेंत वृत्तपत्रांच्या कागदाचा पुरवठा होत नसल्यामुळें वृत्तपत्रें बंद होण्यासारखी परिस्थिति उत्पन्न झाली असून ह्या परिस्थितीचा फायदा घेण्याचा प्रयत्न रशियाकडून होत आहे. द. अमेरिकेप्रमाणेंच हिंदुस्थानांतही रशिया आपलें व्यापारी जाळें पसरण्याचा संभव आहे. पाकिस्तान आणि हिंदुस्थान ह्या दोन्ही देशांना लागणारा कागद अमेरिकेनें पुरवणें जरूर आहे. नाहींतर, अमेरिकेचीं मित्र असलेलीं राष्ट्रें रशियाकडे झुकण्याची शक्यता आहे.

रशिया आणि अमेरिका ह्यांनीं आपापले स्वतंत्र राजकीय गट केलेलेच आहेत, परंतु आतां ह्या दोन गटांत व्यापारी स्पर्धाही सुरू होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. ह्या स्पर्धेंत रशियाला त्याच्या पद्धतीमुळें एक विशिष्ट फायदा मिळतो. आज जी डॉलर्स टंचाई आहे तिची बाधा रशियाशीं व्यापार करतांना होत नाहीं. कारण, रशिया हुंडणावळीची भानगड न ठेवतां पुष्कळदा मालाची ऐनजिनशीं अदलाबदल करतो. ह्या पद्धतीचा फायदा घेऊन ज्या राष्ट्रांजवळ डॉलर्स नाहींत तीं राष्ट्रें आपल्या गरजा भागवितां येतील तशा भागविण्यास मागेंपुढें पहाणार नाहींत, हें उघड आहे. भारताला डॉलर्सची चणचण कशी भोंवते तें स्पष्टच आहे. परराष्ट्रीय राजकारणांत तटस्थाची भूमिका स्वीकारल्यामुळें भारताला आपल्या सोयीचे व्यापारी हितसंबंध घडवून आणणें सोयीचें जाईल असें मानण्यास हरकत नाहीं.

---

### १० सिगारेटस्‌चे १,००० पौंड

दि स्कॉटिश लाइफ ॲशुअरन्स कंपनीनें आपल्या प्रसिद्धीसाठीं एक नाविन्यपूर्ण योजना केली आहे. एका आकर्षक पत्रकावर २० सिगारेटस्‌चें पाकीट काढलें आहे, त्यांतील १० सिगारेटस् काढून घेतलेल्या दाखविल्या आहेत. आंत त्याचा खुलासा केला आहे, कीं ह्या १० सिगारेटस्‌च्या किंमतींत ३० वर्षांत १,००० पौंड मिळूं शकतील. रोजच्या १० सिगारेटस् म्हणजे महिन्याचे २ पौंड, १२½ शिलिंग झाले. तीस वर्षांत त्याचे १,०६४ पौंड होतील. ह्याच रीतीनें, वेगवेगळ्या पद्धतींचीं विम्याचीं कोष्टकें दिलीं आहेत.

## वेस्टर्न इंडियाची वार्षिक सभा

### चेअरमन डॉ. मोरेश्वर नारायण आगाशे, एम्. बी. बी. एस. ह्यांच्या भाषणांतील उतारे.

आपले कंपनीचें नवीन कामांत अप्रतिहत प्रगति होत आहे तरी एकंदरींत आपल्या भारतांत होणारें एकूण काम प्रतिवर्षी कमीच होत चालल्याचें दिसतें. तरी पण ही परिस्थिति कायम टिकणारी नसल्यानें निराश होण्याचें मला कांहींच कारण दिसत नाहीं. कारण, गतवर्षी मी सूचित केल्याप्रमाणें आपल्या देशांत विमाव्यवसायास भरपूर क्षेत्र असून उत्तरोत्तर विमासंरक्षणाची आवश्यकता जनतेला अधिकाधिक पटत चालली आहे, ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे. आपलें सरकारहि नोकरवर्गास सक्तीचा विमा, प्रॉ. फंड योजना लागू करून त्यांना सुखस्वास्थ्याची थोडी फार निश्चिंतता प्राप्त करून देण्याचे आपलें परीनें प्रयत्न करीत आहे. या दृष्टीनें योग्य रीतीनें प्रत्यक्ष पाऊल मद्रास सरकारनें पुढें टाकलें असून पेन्शन, प्रॉ. फंड व इन्शुअरन्स अशी संयुक्त योजना तयार करून पगाराचे श्रेणीनें सर्व नोकरवर्गास विमायोजना सक्तीची केली आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. अशाच रीतीनें आपलें मुंबई सरकारहि कांहींतरी योजना लवकर करील अशी आशा आहे. पण असें असलें तरी विमा कंपन्यांनीं आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. अजूनहि आपले देशांत बराच मोठा वर्ग अशिक्षित आहे. बदलत्या काळाबरोबर मोठ्या उत्पन्नाचा ओघ शहरांतून वास्तव्य करणाऱ्या वर्गांतून व सुशिक्षित समाजाकडून आतां तो खेडोपाडीं विखुरलेल्या शेतकरी कामकरी या वर्गाकडे जात आहे.

### विमा शिक्षण

हिंदुस्थानांत विमा व्यवसायाची वाढ संपूर्णतेनें करावयाची असेल तर प्रथमतः सशास्त्र विमाशिक्षण देणें ही गोष्ट अत्यंत आवश्यक आहे व त्यासाठीं सर्व विमा कंपन्यांनीं प्रयत्न करणें जरूरीचें आहे. आपल्या इंडियन लाइफ अिन्शुअरन्स ऑफिसेस असोसिएशननें अशा प्रकारचा अगदीं योग्य उपक्रम बोर्ड ऑफ एज्युकेशन स्थापन करून केला आहे. आपणही आपल्या वतीनें चिरमले अिन्शुअरन्स अिन्स्टिट्यूटमार्फत कंपनीचे नोकरवर्गाचें शिक्षणाची सोय करीत आहोंत व समाधानाची गोष्ट अशी कीं, नोकरवर्गही या सवलतीचा फायदा घेत असून परीक्षांचे निकालही आशाजनक असतात. कंपनीचा नोकरवर्ग व एजंट मंडळी या संस्थेचा अधिकाधिक फायदा घेऊन आपली कार्यक्षमता वाढवून आपली सर्वांगीण उन्नति करून घेतील व आपले कर्तबगारीचा सदुपयोग कंपनीचे कामास व जनसेवेसाठीं करतील अशी आशा आहे. आपले कंपनीचे सुविद्य मॅनेजर श्री. कृ. य. जोशी उर्फ बाळासाहेब जोशी, बी.ए., एफ. आय. अे. चालू वर्षीही अिंडियन लाइफ अिन्शुअरन्स ऑफिसेस असोसिएशनचे एक्झिक्युटिव्ह कमेटीचे सभासद असून खेरीज असोसिएशननें स्थापन केलेल्या बोर्ड ऑफ एज्युकेशनचेही सभासद म्हणून आहेत, ही आपणा सर्वांना मोठ्या आनंदाची व अभिमानाची अशी निःसंशय बाब आहे.

### गेल्या वर्षांतील कंपनीची प्रगति

गेल्या वर्षी एकंदरीनें बिकट परिस्थिति असूनही कंपनीनें कामकाजांत प्रगति केल्याचें आपणांस दिसून येईल. गेल्या सालीं कंपनीनें लाइफ फंडांत ४८ लाख, ४० हजारांची भरघोस भर घालून तो आतां ५ कोटी, १५ लाखांवर झाला आहे. कंपनीच्या आर्थिक स्थैर्याचें तें निदर्शक आहे. १९४९ च्या सरकारी इन्शुअरन्स इयरबुकाप्रमाणें सर्व कंपन्यांचें मिळून व सर्वांत जास्त हप्ते वसुलीचें उत्पन्न असलेल्या सहा मोठ्या कंपन्या त्यांतून वगळतां, असें सरकारी खर्चाचें प्रमाण अनुक्रमें २९·० व ३२·४ असें आहे. या दृष्टीनें पहातां आपलें खर्चाचें प्रमाण २३·५४ हें अगदीं मर्यादित व समाधानकारकच आहे असें दिसून येईल. तसेंच वरील सरकारी रिपोर्टाप्रमाणें १९४८ सालीं सर्व कंपन्यांचा पडलेला निव्वळ व्याजाचा दर ३·०२ असा आहे. १९४८ सालीं आपले कंपनीस निव्वळ व्याजाचा दर ३·३० असा पडला आहे. परंतु अहवालाचे सालीं मात्र याहून चांगला निव्वळ व्याजाचा दर म्हणजे ३·४४ प्रमाणें पडत आहे.

### आपल्या संलग्न संस्था

यांपैकीं युनायटेड वेस्टर्न बँक ही संस्था आपणा सर्वांना सुपरिचित झालेली आहेच. या बँकेचा व्याप आस्ते आस्ते वाढतच असून तिचें भवितव्य उज्ज्वल आहे व वेस्टर्न इंडियाची दुसरी संलग्न संस्था वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अँड एक्झिक्युटर कंपनी ही असून त्या कंपनीचा ताळेबंद व अहवाल यांचा समावेश आपले प्रतिवृत्तांत आहेच. या वर्षी कंपनीस १ लक्ष, ५४ हजार किंमतीचे मिळकतींचे विश्वस्त म्हणून नेमले असून मुखत्यारपत्रान्वयें ८ लक्ष ४३ हजार रु. किंमतीच्या मिळकतींचा कारभार कंपनीनें स्वीकारलेला आहे. शिवाय आयुर्वेदामध्यें संशोधन करणेंसाठीं नागपूर युनिव्हर्सिटीनें सुरू केलेल्या आयुर्वेदासनासाठीं इंडियन फॉर्मासिस्टस् असोसिएशन मुंबईतर्फे दिल्या जाणाऱ्या देणगीकरतां या कंपनीची जामिनकी नागपूर विद्यापीठानें मान्य केली आहे. तसेंच रु. १६०० चा रिझर्व फंड निर्माण करून खेरीज भागीदारांना ४ टक्केप्रमाणें डिव्हिडंड चालू वर्षी देण्याचें ठरविलें आहे. यावरून सदर संस्था योग्य मार्गावर आहे हें सहजीं दिसून येईल.

तिसरी संलग्न संस्था विमा मुद्रक व प्रकाशक लिमिटेड ही होय. या नांवावरूनच संस्थेच्या कार्याबद्दल कल्पना येणेसारखी आहे. गतवर्षी मी म्हटल्याप्रमाणें वेस्टर्न इंडिया व तिच्या संलग्न संस्था यांना फार मोठी छापील स्टेशनरी लागते व योग्य दरांत वेळेवर व उत्तम रीतीनें मिळत जावी म्हणूनच या संस्थेची स्थापना करणेंत आली आहे. यामुळें छपाईचें काम सुबक व सत्वर होत आहेच, पण त्याखेरीज खर्चही माफक आहे. ही गोष्ट या संस्थेनें पहिलेच वर्षी जें कार्य केलें त्यावरून स्पष्टच होत आहे. पहिलेच वर्षी एकूण नफा सुमारें ५,२००रु. होऊन मशिनवरील घसाऱ्याची अंदाजी रु. ३,६०० ची तरतूद करून ३ टक्के प्रमाणें डिव्हिडंड देण्याचें ठरलें आहे.

---

**ब्यूनॉस एअर्समध्यें गांधी रस्ता**—दक्षिण अमेरिकेंतील ब्यूनॉस एअर्स ह्या शहराच्या म्युनिसिपालिटीला कांहीं नागरिकांतर्फे अशी विनंती करण्यांत आली आहे कीं, शहरांतील एका रस्त्याला गांधी रस्ता असें नांव देण्यांत यावें. आधुनिक कालांतील एक महान् विचारवंत म्हणून गांधीजींना हा मान देण्यांत यावा असें वरील नागरिकांचें म्हणणें आहे.

**हिंदी मालाचें प्रदर्शन**—बँगकॉक (सयाम) येथील वकिलातीतर्फे हिंदी मालाचें एक प्रदर्शन तेथें उघडण्यांत यावयाचें आहे. ह्या प्रदर्शनांत हिंदी कारखान्यांनीं केलेला आणि ग्रामोद्योगाचा माल ठेवण्यांत येणार आहे. सोनेरी आणि रुपेरी कलाबतूंचे नमुनेहि ठेवण्यांत येतील. अशा कलाकुसरीच्या कामाला पूर्वेकडील देशांत चांगली मागणी आहे.

## उत्पादनवाढ व मजुरी

लेखकः– श्री. विवेक परदेशी

दि. १४ जून च्या अंकांतील श्री. चितळे यांचा लेख वाचला. 'अधिक उत्पादन, अधिक मजुरी' हें तत्त्व त्यांनीं मांडलें. तत्त्व मान्य पण तें आजच्या वातावरणांत प्रत्यक्षांत उतरणें कितपत शक्य आहे ?

मजूर चळवळीबद्दल त्यांनीं म्हटलें तें खरें आहे. त्यांत बदल होण्याची शक्यता कितपत आहे ? मजुरांचे हक्क प्रस्थापित करण्यासाठीं, त्यांना अधिक वेतन, अधिक सवलती मिळवून देण्याकरितां त्यांची चळवळ असते. मजूर पुढाऱ्यांनीं इतर गोष्टींचा, मालकवर्गाच्या अडीअडचणींचा विचार करावयाचा नसतो. मजूर चळवळीचें संप हें एक प्रभावी हत्यार आहे. इंग्लंड–अमेरिकेंतही याच पद्धतीवर चळवळी चालत असल्याचें दिसतें. हिंदुस्थान अपवाद कसा असेल ?

मजूर बाजारांत जाऊन माल खरेदी करतांना घासाघीस करून शक्य तितका उत्तम प्रतीचा माल शक्य तेवढ्या कमी किंमतींत घेतो. स्वतःचे श्रम 'विकतांना' मात्र तो अळमटळम् करतो हें खरें आहे. पण ही मनोवृत्ति मालकवर्गांत नाहीं असें का आहे ? बाजार तेजीचा असला म्हणजे वाईट माल गिऱ्हाइकाचे माथीं मारून स्वतःच्या देशांतच नव्हे, तर परदेशांतही अनेकवार हिंदी कारखानदार व व्यापारी यांनीं अप्रतिष्ठा मिळविलेली आहे.

"सरकारनें मजुरांकरितां फार, फार केलें" या विधानांत सत्यांश आहे. पण त्याबरोबरच नेहरू–सरकार म्हणजे पुंजी-पतींचें सरकार असेंही म्हटलें नाहीं का जात ? किती काळा-बाजारवाले फांशी गेले ? शेठ डालमिया आणि सरदार पटेल–पंडित नेहरू यांचा पत्रव्यवहार काय दाखवितो ? त्याची पार्श्वभूमिका काय आहे ?

परिस्थिति पालटत आहे, कारखान्यांचे नफे घसरगुंडीला लागले आहेत, ही सद्यःस्थिति आहे. या परिस्थितीला कामगार जबाबदार किती आणि इतर घटना किती जबाबदार ? उत्पादन वाढविण्याबाबत खुद्द मालक लोकांनीं कोणते प्रयत्न केले आहेत ? युद्धकाळांत दोन्ही हातांनीं ओरपलेला पैसा घातला का त्यांनीं धंद्यांत ? आणलीं, बसवलीं का नवीन यंत्रें ?

सरकारनें पुष्कळ ठराव-कायदे केले पण त्यांत उत्पादनाच्या जबाबदारींत कामगारांची भागीदारी आहे असें कोठें विशेष जोरानें म्हटल्याचें आढळत नाहीं हें खरें आहे. कोठेंही उत्पादन-मजुरीचा संबंध लावण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. औद्योगिक कोर्टांचे निवाडे पाहिले तर जवळ जवळ सर्व ठिकाणीं पगारवाढ, बोनस, रजा, मंजूर केल्याचें आढळतें. कारखान्यांतील कामगार कमी करणेंही आतां मालकवर्गाच्या हातांत राहिलेलें नाहीं. तेथेंही सरकारी कोर्ट येतें. कायदा झाला कीं कायदेशीरपणा आलाच. मला वाटतें, यापुढें कारखान्यांच्या कामांतील शिस्त, उत्पादन, वेतन इत्यादी बाबतची जबाबदारी सरकारवर अधिक पडते.

सरकारच्या मजुरविषयक धोरणाची खरी परीक्षा मंदीच्या काळांत होत असते. मंदीच्या काळांत नोकरींविषयक असलेल्या बेकारी, आजार व वृद्धावस्था वेतनाच्या कोणत्याच योजना सरकारनें अजून हातीं घेतलेल्या नाहींत. मजुरीच्या दरांची घसरगुंडी व बेकारीची वाढ यांना आळा घालण्यास सरकारजवळ कोणतेंच साधन उपलब्ध नाहीं. तथापि, सरकारनें मनांत आणल्यास विशेष पैसा खर्च करून त्यांची अल्प सोय मंदींतही करतां येईल. पण याचा अर्थ एवढाच होईल कीं कारखाना, सरकार व औद्योगिक मजूर यांच्या संगनमतानें इतर वर्गांवर फार बोजा पडेल.

उत्पादन व मजुरी यांचे परस्परसंबंध मालक–मजुरांनीं एकत्र बसून ठरवावे हें ठीक आहे. परंतु रहाणीच्या खर्चांत सतत वाढ होत असतां मजुरीचे दर कायम राहणें शक्य आहे का ? ही जबाबदारी सरकारची. त्यानें काय केलें आहे याबाबत ?

शिवाय सरकारी कोर्टांकडून कायद्यानें वेतन ठरवून घेतां येत असतांना अश्रद्ध दोघे एकत्र नाहीं आले तर नवल काय ?

"कच्च्या मालाचा दर्जा उतरल्यास कांहीं वेळां हलका माल आणावा लागेल. मजुरींत थोडी त्या प्रमाणांत वाढ करण्याचें अगोदर ठरवून यावें." पक्क्या कमदर्जाच्या मालाला किंमत कमी येणार. अशा वेळीं कारखानदार कामगाराला अधिक वेतन द्यावयास तयार होईल का ?

"कारखान्याबद्दल, कामगाराच्या मनांत आपुलकीची भावना उत्पन्न करून (मालकांनीं) यापुढें वागावें." भावना ये म्हणून उद्याला येत नसते. ती रुजावी, वाढावी लागते. दैनंदिन व्यवहारांत चालक मंडळी कामगारांशीं कशी वागतात यावर पुष्कळसें अवलंबून असतें. मालकशाही मनोवृत्तीचे मालक मजुरांच्या मनांत कारखान्याबद्दल आपुलकी कधींतरी उत्पन्न करूं शकतील का ?

महाराष्ट्रीय कारखानदारीचें स्वरूप कांहींसें वैशिष्ट्यपूर्ण आहे. महाराष्ट्रीय कारखानदार प्रथम कामगार आणि मग कारखानदार आहेत; भांडवलदार नाहींत. कारागीर किंवा विश्वविद्यालयीन जीवनांतून त्यांची कारखानदारी जन्माला येते. बहुधा कामगारांबरोबरच ते कारखान्याच्या जवळपास राहतात. कारखान्यांतील उत्पादनावर कामगारांप्रमाणेंच त्यांचाही जीवितचरितार्थ अवलंबून असतो. कारखान्याच्या उत्कर्षांत त्यांच्या साऱ्या आशाआकांक्षा सामावलेल्या असतात.

असें असलें तरी आजच्या वर्ग–विग्रहाची, ज्ञाती–ज्ञातींतील अप्रीतीची, राजकीय विविध मतप्रणालीची झळ महाराष्ट्रीय कारखानदारीला लागणार नाहीं, असें निश्चयानें कोण व कसें म्हणूं शकेल ?

---

**उत्पादन पूर्वीइतकें झालें**—संयुक्त राष्ट्रसंघानें केलेल्या एका अहवालांत अशी माहिती दिली आहे कीं, ब्रिटन, फिनलंड, फ्रान्स, हंगेरी ह्या देशांतील उत्पादन आतां युद्धपूर्व काळाइतकें झालें आहे. या राष्ट्रांची उत्पन्नें आतां १९३८ सालाच्या उत्पन्नाबरोबर झालीं आहेत.

**प्रो. ब्लॅकेट सिलोनला येणार**—आंतरराष्ट्रीय कीर्ति पावलेले सुप्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ प्रो. ब्लॅकेट हे येत्या डिसेंबर महिन्यांत सिलोनला भेट देणार आहेत. सिलोन असोसिएशन ऑफ सायन्सच्या वार्षिक अधिवेशनांत ते भाषण करणार आहेत.

**जर्मनीची स्पर्धा जाणवूं लागली**—फ्रॅंकफर्टमधील ब्रिटिश कंट्रोल कमिशननें काढलेल्या मासिक पत्रिकेंत असें नमूद करण्यांत आलें आहे कीं, पश्चिम जर्मनींत तयार झालेल्या मालाची स्पर्धा आतां जगांतील बहुतेक बाजारपेठांतून जाणवूं लागली आहे.

**बडोद्याच्या महाराजांचा ब्रिटनमधील प्रासाद**—सरे परगण्यांत बडोद्याच्या महाराजांचा 'हेडले ग्रोव्ह' नांवाचा एक प्रासाद होता. हा प्रासाद एका ब्रिटिश व्यापाऱ्यानें २७,००० पौण्डाला विकत घेतला आहे. ह्या इमारतींत २३ खोल्या आहेत. १९४६ सालीं महाराजांनीं ही इमारत ३०,००० पौण्डाला विकत घेतली. तींत सुधारणा करण्यासाठीं आणखी २०,००० पौण्ड खर्च केले असें समजतें.

( मिरज येथें १९२९ सालीं स्थापन झालेली मागीदारांची जबाबदारी मर्यादित )

# दि मिरज स्टेट बँक लि.

## –मिरज–

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९२९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )
★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेंचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन. के. डी. शिराळकर मॅनेजर

फोनः ३४५१६ तारः SAHYOG

# दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करते:–

सूत, रसायनें, रंग, कच्ची कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन. टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस सहाय्य करते:—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस अँड क्रॅफ्टस, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.

# दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई, स्थापन साल १९११

चेअरमनः–श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | | |
|---|---|---|
| भागांचें भांडवल | रु. | ३०,९१,००० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. | ३०,९७,८०० |
| ठेवी | रु. | ७,२२,४२,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ९,२०,५०,००० |

## १३ जिल्ह्यांत ५७ शाखा

हिंदी संघामधील महत्त्वाच्या शहरांमधून हुंड्या, बिलें वगैरे वसूल केलीं जातात. वेगवेगळ्या प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. त्यांच्या शर्तींबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरीः–भोर, जि. पुणें.

शाखाः–पुणें, पाली व शिरवळ.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. | ६९,६०० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. वृ. खोले. श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. श्री. वा. ग. धंदुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी

पुणें कचेरीः–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबा नजिक

अधिक माहितीसाठी लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. ) मॅनेजर.

## साखर टंचाईबाबत आरोपांची माहिती

### कमिटीची सहाय्याची विनंती

मागील वर्षी झालेल्या साखर टंचाईच्या बाबतींत निरनिराळे अधिकारी आणि इतर हितसंबंधी लोक यांचे विरुद्ध करण्यांत आलेल्या आरोपांची चौकशी करण्यास एक समिती स्थापन केल्याचें भारत सरकारनें यापूर्वी जाहीर केलें आहे. साखरेच्या टंचाईबाबत करण्यांत आलेले आरोप माहितीसाठी पुढें देण्यांत येत आहेत.

(१) १९४८-४९ च्या हंगामांत साखरेच्या कारखान्यांना साखरेच्या वहातुकीसाठी जादा वाघिणींचा पुरवठा करण्यांत आला होता.

(२) १९४९ मध्यें भारतांत विकण्यासाठी दिलेली साखर मोठ्या प्रमाणांत पाकिस्तानांत पाठविण्यांत आली.

(३) उत्तर प्रदेश सरकार आणि मध्यवर्ति सरकार यांनीं अनुक्रमें २६ ऑगस्ट आणि २ सप्टेंम्बर, १९४९ रोजीं काढलेल्या साखर गोठविण्याबाबतच्या हुकुमांचा भंग करून अनेक कारखान्यांनीं साखर रवाना केली.

(४) बरेच कारखाने आणि त्यांचे प्रतिनिधी यांनीं जुलै-ऑगष्ट १९४९ मध्यें ठरवून दिलेल्या किंमतीपेक्षां भरमसाट किंमत आकारली.

(५) साखर कारखान्यांच्या प्रवक्त्यांनीं मे-जून १९४९ मध्यें ६०,००० टन साखर निर्यात करण्यासाठीं सूचना केली आणि ही सूचना बाजूला टाकण्यांत आली यासंबंधीची परिस्थिती.*

(६) साखरेची टंचाई होण्यापूर्वी कारखानदारांनीं साखरेचा बराच साठा आपल्या गुदामांत नेऊन ठेवला होता. तसेंच कारखानदारांनीं आणि व्यापाऱ्यांनीं उत्तर प्रदेश आणि मध्यवर्ती सरकार यांनीं साखर गोठविण्याबाबतचा हुकूम काढण्याच्या कालावधींत बिहार राज्यांतील कारखान्यांतून साखरेचा साठा हलविला होता. जुलै ते ऑगष्ट १९४९ या काळांत साखरेच्या कारखानदारांनीं आणि व्यापाऱ्यांनीं जास्त पैसे देऊन खरेदी केलेली साखर भरमसाट किंमतीस विकतां यावी म्हणून ती निरनिराळ्या ठिकाणीं रवाना केली होती.

* या बाबतची कोणास माहिती द्यावयाची असल्यास पत्रव्यवहार चिटणिस, साखर चौकशी समिति, जामनगर हाऊस, नवी दिल्ली, या पत्त्यावर करावा. सदरहू बाबतींत मसुदे किंवा निवेदनें करावयाचीं असल्यास अगर तोंडी साक्ष देणें असल्यास तें समितीला २० जुलै, १९५० पर्यंत कळलें पाहिजे.

### वेस्टर्न इंडियाचे बोनस शेअर

वेस्टर्न इंडिया विमा कंपनीच्या ताळेबंदांत जो शिल्लक, न वांटलेला नफा (डिव्हिडंड ईक्वलायझेशन रिझर्व्ह) आहे, त्यापैकीं ६७,२०० रुपयांचें भांडवलांत रूपांतर करून त्याचे बोनस शेअर्स भागीदारांना देण्यांत येतील. ३१ मार्च दिवशीं भागीदारांचे जे शेअर असतील, त्याच्या प्रत्येक दोन शेअर्सना एक बोनस शेअर्स मिळणार आहे. कंपनीचें सध्यांचें खपलेलें भांडवल २,६८,८०० रुपयांचें (२,६८८ शेअर्स) असून त्याचे पोटीं १,३४,४०० रुपये वसूल केलेले आहेत. डि. ई. रिझर्व्हमध्यें १,४४,४९९ रु. शिल्लक आहेत. ते सध्याच्या १०% दरानें डिव्हिडंड देण्यास १० वर्षें पुरलें असते.


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड
हेड ऑफिस : पुणें शहर
शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)
पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)
श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)
अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ३,९८,२८५
एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.



## टेलिफोन-विषयक उद्बोधक आकडे

**मोठ्या लोकसंख्येच्या देशांत टेलिफोनचें प्रमाण अत्यल्प**

सबंध जगांत ६,५८,००,००० टेलिफोन आहेत. त्यांपैकी ३,८२,०५,००० एकट्या अमेरिकेंत आहेत. प्रत्येक १०० वस्तीस २.८ टेलिफोन असें जागतिक प्रमाण आहे; अमेरिकेंत १०० वस्तीस २६.१ टेलिफोन असें प्रमाण पडतें. भारतांत हेंच प्रमाण १०० वस्तीस ०.१ पेक्षांहि कमी पडतें. खालील तक्त्यांत खंडवार माहिती दिली आहे.

| | टेलिफोन संख्या | जागतिक संख्येशीं प्रमाण% | १०० लोकसंख्येशीं प्रमाण |
|---|---|---|---|
| उत्तर अमेरिका (यु. स्टेट्स वगळून) | २९,५९,००० | ४.५ | ४.६ |
| यु. स्टेट्स | ३,८०,०५,००० | ५८.१ | २६.१ |
| द. अमेरिका | १५,७४,००० | २.४ | १.५ |
| युरोप | १,८९,४०,००० | २८.८ | ३.२ |
| आशिया | १९,२३,००० | २.९ | ०.२ |
| आफ्रिका | ७,३५,००० | १.१ | ०.४ |
| ऑस्ट्रेलिया | १४,६४,००० | २.२ | १.४ |
| जग | ६,५८,००,००० | १००.० | २.८ |

दर १०० माणशीं १५ पेक्षां ज्यास्त टेलिफोन असणारे जगांत फक्त ६ देश आहेत: युनायटेड स्टेटस (२६.१) स्वीडन (२२.१) कॅनडा (१८.८) न्यूझीलंड व स्वित्सरलंड (१७.२) आणि डेन्मार्क (१५.३)

दक्षिण अमेरिकेंत दर शंभर माणशीं सर्वांत ज्यास्त टेलिफोन (४.१) अर्जेंटिनामध्यें आहेत. युरोपांत स्वीडन (२२.१) अग्रेसर आहे. आशियांतील पुढारीपणाचा मान इस्राएलला (२.४) आहे. आस्ट्रेलियांत पहिला क्रमांक न्यूझीलंडचा (१७.२) आहे. आफ्रिका खंडांत युनियन ऑफ साउथ आफ्रिका (३.२) सर्वांच्या पुढें आहे.

युनायटेड स्टेट्समध्यें दर १०० माणशीं २६.१ टेलिफोन आहेत; बाकीच्या जगांत हें प्रमाण १ पेक्षां फारसें जास्त नाहीं.

ज्या देशांत लोकसंख्या जास्त त्या देशांत टेलिफोनची वाढ प्रमाणशीर झालेली नाहीं. उदाहरणार्थ, चीनमध्यें १,८४० लोकसंख्येस फक्त १ टेलिफोन वाट्यास येतो. भारतांत हें प्रमाण २,६५० लोकसंख्येस १ असें पडतें. रशियांत १४२ लोकसंख्येमागें १ टेलिफोन आहे. ह्या तीन देशांत मिळून जगांतील निम्मे लोक रहातात परंतु जगांतील एकूण टेलिफोनच्या फक्त १/३५ (एक पस्तिसांश). टेलिफोन तेथें आहेत. ह्या उलट, युनायटेड स्टेट्समध्यें जगांतील ६% लोक रहात असूनहि तेथें जगांतील एकूण ६०% टेलिफोन आहेत.

टेलिफोनची शहरांगणिक संख्या पाहिली, तर सॅन फ्रॅन्सिस्कोमध्यें प्रत्येक १०० लोकांस ४९.६ टेलिफोन आहेत. त्याचे खालोखाल वॉशिंग्टन (४७.७), स्टॉकहोम (४५.५) व बर्न (४०.४) हीं शहरें आहेत. मुंबई शहरांत ३२,०९२ टेलिफोन असून दर १०० माणशीं ०.९ असें प्रमाण पडतें. कलकत्ता येथें ३०,९९० टेलिफोन असून तेथील प्रमाण ०.५ आहे. सबंध भारतांत १,२६,४१२ टेलिफोन असून ही संख्या जागतिक टेलिफोन संख्येच्या ०.२% आहे. सबंध भारतांत दर २,६५० माणसांगणिक फक्त १ टेलिफोन आहे. पाकिस्तानांत १६,४५४ टेलिफोन आहेत. जपानमध्यें १३,४२,५५२ टेलिफोन असून तेथें दर माणशीं १.७ टेलिफोन असें प्रमाण पडतें.

बेडेकर लोणचीं

Dr Waman Gopal's Sarsaparilla
BEST BLOOD PURIFIER

दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)
पुणें शाखा:—९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.
मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.— ब्रँच सेक्रेटरी

दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड
हेड ऑफिस:—६७, अपोलो स्ट्रीट, सोनावाला बिल्डिंग, मुंबई.
★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे. आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.
शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर.

उंची कपड्याचा व स्नानाचा उत्तम साबण निर्मल सोप
दि माणिक सोप वर्क्स, कराड (सातारा)

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व [illegible] वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.